R-AD

OIC

माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 3532 दिनांक :- 31/10/22

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.२८/१०/२०२२

१. अपिलकर्ता श्री.नेताजी नामदेव शेरखाने
राहणार :- स.नं.१३१/१ पानमळा वसाहत
सिंहगड रोड पुणे ३०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक
परिमंडळ क्र.४,
पुणे महानगरपालिका.

श्री. नेताजी शेरखाने
विरूध्द
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. नेताजी शेरखाने यांनी दिनांक २३/०८/२०२२ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक, परिमंडळ क्र.४, पुणे महानगरपालिका यांचेकडे जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत दिलेल्या NOC व चलनाच्या प्रती मिळणेकामी अर्ज केला होता.

सदर माहिती अवलोकन करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहणेबाबत जा.क्र.२५१८ दि.०२/०९/२०२२ अन्वये कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक यांनी कळविलेचे सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २३/०८/२०२२ | २२/०९/२०२२ | ०२/०९/२०२२ | निरंक | ०२/०९/२०२२ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री.शेरेखाने यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– ''माहिती मुदतीत मिळाली नाही.''

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा द्विनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०१/१०/२०२२ | ०३/१०/२०२२ | नाही | नाही | १९/१०/२०२२ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २८/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत दिलेल्या NOC व चलनाच्या प्रती मिळणेकामी अर्ज केला होता. | सदर माहिती अवलोकन करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहणेबाबत जा.क्र.२५१८ दि.०२/०९/२०२२ अन्वये कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक यांनी कळविलेचे सांगितले. |

## विवेचन

माहिती अधिकार अर्जात मागणी केलेप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अवलोकन करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहणेबाबत जा.क्र.२५१८ दि.०२/०९/२०२२ अन्वये कळविलेचे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक यांनी कळविलेचे सांगितले. अर्जदारास कळविलेप्रमाणे आजतागायत अर्जदार माहिती अवलोकन करणेकामी कार्यालयात आले नसलेचे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक यांनी कळविलेचे सांगितले. अर्जदाराने शुल्क न भरलेने अर्जदारास माहिती उपलब्ध करून देता आली नसलेचे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक यांनी सांगितले.

## -: आदेश :-

अपिलकर्ता सदर सुनावणी कामी अनुपस्थित असून अपिल अर्जात नमूद केलेप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अपिलार्थी यांस अवलोकन करणेकामी, उपलब्ध करून द्यावी व मा. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक यांनी अपिलकर्ता यांस आठ दिवसांचे कालावधीमध्ये सदर माहिती विनामुल्य देणेत यावी. तसेच सदर बाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

28/10/22

(डॉ. ज्योती धोत्रे)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: २८/१०/२०२२ ,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. अपिलकर्ता श्री.नेताजी नामदेव शेरखाने
राहणार :- स.नं.१३१/१ पानमळा वसाहत
सिंहगड रोड पुणे ३०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक
परिमंडळ क्र.४,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......